
हबल खजिना

(हबल अंतराळ दुर्बिणीने टिपलेल्या प्रकाशचित्रांवर आधारित मालिका)



"बार्ड दीर्घिका"

आपल्या विश्वात असलेल्या दीर्घिकांचे त्यांच्या आकारावरून विविध प्रकार पाडण्यात आले आहेत. हे प्रकार आहेत - सर्पिलाकार, लंब-वर्तुळाकार आणि अनियमित. यापैकी सर्पिलाकार दीर्घिकांचा एक उपप्रकार म्हणजे "बार्ड दीघिका". हिच्या मध्यभागी दांड्यासारखा भाग असल्यामुळे तिला "बार्ड" असे म्हणतात. विश्वात असलेल्या एकूण सर्पिलाकार दीर्घिकांपैकी २/३ "बार्ड" प्रकारात येतात. या दांड्यात तारे मोठ्या संख्येने असतात. सोबतच्या चित्रात अनेक तेजस्वी तारे, चमकणारे वायू आणि दोन ताऱ्यांमध्ये असलेले काळे मेघ दिसत आहेत. हबलने घेतलेल्या प्रकाश-चित्रांमध्ये ही प्रतिमा खूप महत्वाची मानली जाते कारण तिच्यात "बार्ड" दीर्घिकेची सर्व वैशिष्ट्ये टिपलेली आहेत. त्या अर्थाने ही "पूर्ण" प्रतिमा आहे. आपली दीर्घिका -म्हणजे आकाशगंगा याच प्रकारची आहे असे मानले जाते.

संकल्पना आणि लेखन - प्रा. गिरीश पिंपळे (सौजन्य: नासा / इसा). gpimpale@gmail.com

Loksatta, 5/4/11, Page No - 6.